" लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास"

मानव्यविद्या शाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधिका

जाधव सुचिता बबनराव

(एम.ए., बी.एड्., एम. फिल.)

मार्गदर्शक

डॉ. वाघमारे जनार्धन केशवराव

सहयोगी प्राध्यापक (भूगोल)

(एम.ए., एम. फिल., पीएच.डी.)

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर

भूगोल संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

ऑगस्ट - 2017

लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास

प्रस्तावनाः-

'भूगोल' हा प्राचीन विषय आहे. अगदी प्रारंभिक अवस्थेत 'भूगोल' म्हणजे पृथ्वीचे वर्णन करणारे शास्त्र अशी व्याख्या केली गेली होती. पृथ्वीवर ज्या ज्या गोष्टी मानवाला आढळल्या त्या सर्वाचे निरीक्षण करून मानवाने त्यांच्या नोंदी केल्या व तेथूनच भूगोलाची सुरूवात झाली.

'लोकसंख्या भूगोल' ही मानवी भूगोलाचीच नव्याने उदयास आलेली एक उपशाखा आहे. लोकसंख्या किंवा मानवी समुह हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात महत्वाचा घटक आहे. मानवाकडे असलेली बौद्धिक क्षमता, कल्पकता, दुरदृष्टी, श्रम करण्याची प्रवृत्ती, शास्त्रीय तांत्रिक ज्ञान इ. गुणांमुळे तो विविध सांधनाची निर्मिती करतो व आपले जीवन सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो म्हणून मानवास एक प्रमुख भौगोलिक अभिकर्ता म्हणून संबोधले जाते.

इ. स. 1953 मध्ये जी. टी. त्रिवार्था यांनी अमेरिकन भूगोल तज्ञांच्या परिषदेमध्ये लोकसंख्या भूगोलास मानवी भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून मान्यता देण्यासंबंधी भूगोल तज्ञांना अवाहन केले. लोकसंख्या भूगोलास भूगोलाची एक महत्वपूर्ण शाखा म्हणून विकसित करण्याचे कार्य सर्वप्रथम जी. टी. त्रिवार्थानी केलेले असल्यामुळे त्यांना "लोकसंख्या भूगोलाचे जनक" या नावाने संबोधले जाते.

लोकसंख्या भूगोलात प्रामुख्याने पृथ्वीवरील लोकसंख्या या घटकाचा अभ्यास केला जातो. लोकसंख्येच्या वितरणावर विविध घटक परिणाम करतात. त्यामध्ये जन्मदर, मृत्यूदर, साक्षरता या घटकाचा समावेश होतो.

साक्षरता हे सांस्कृतिक विकासाचे एकमेव पूर्वाभिमुख साधन असून ते सामाजिक व आर्थिक विकासावर प्रभावकारी ठरणारा महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे वर्तणूक, नैतिकता आणि सामाजिक जाणीव वृद्धींगत होते. साक्षरतेमुळे आंतरराष्ट्रीय संबंध हे मैत्रीपूर्ण व शांततामय राहतात. साक्षरता एखाद्या प्रदेशाच्या विकासाचे प्रतिबिंब असते. कारण साक्षरतेमुळे परस्परातील सामाजिक संबंध

वृद्धिंगत होतात. त्यामुळे आर्थिक, सामाजिक व राहणीमानाचा दर्जा वाढतो. तसेच दरिद्रता घटवण्याचे उत्तम साधन आहे. साक्षरतेमुळे आंतरराष्ट्रीय संबंध हे मैत्रीपूर्ण व शांततामय राहतात. तसेच एखाद्या समाजात किंवा प्रदेशात साक्षरतेचे प्रमाण जास्त असेल तर जन्मदर कमी आढळून येतो. साक्षरतेमुळे अंधविश्वास व गरीबी दूर होण्याची शक्यता जास्त असते. विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत होते.

मानवाद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक क्रियेस 'व्यवसाय' असे म्हणतात. व्यावसायिक रचना ही श्रमजीवी लोकांच्या दृष्टिने अतिशय महत्वाची असते. व्यावसायिक रचनेच्या अभ्यासामुळे व्यापार, धंदा व इतर आर्थिक कामात किती व्यक्ती गुंतल्या आहेत याबद्दल माहिती मिळते. लोकसंख्या भूगोलात व्यावसायिक रचनेचा अभ्यास हा महत्वपूर्ण आहे.

लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करतांना इ. स. 1991 ते इ. स. 2011 यादरम्यानचा जवळपास 20 वर्षाचा कालावधी घेण्यात आला आहे.

अभ्यासक्षेत्रः-

महाराष्ट्र राज्याच्या नकाशामध्ये लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याचे स्थान आग्नेय दिशेला आहे. लातूर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 17^0 52' उत्तर अक्षांश ते 18^0 50' उत्तर अक्षांश आहे. तर रेखावृत्तीय विस्तार 76^0 12' पूर्व रेखांश ते 77^0 18' पूर्व रेखांश आहे. तर उस्मानाबाद जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 17^0 35' उत्तर अक्षांश ते 18^0 40' उत्तर अक्षांश आहे. तर रेखावृत्तीय विस्तार 75^0 16' पूर्व रेखांश ते 76^0 40' पूर्व रेखांश आहे.

लातूर जिल्ह्याच्या दक्षिणेला कर्नाटक हे राज्य आहे. उत्तरेस परभणी व ईशान्येस नांदेड जिल्हा आहे. तर वायव्यकडे बीड जिल्हा आहे. तर दक्षिण पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा आहे. उस्मानाबाद जिल्ह्याच्या पूर्वेस लातूर जिल्हा, पश्चिमेस सोलापूर जिल्हा, वायव्येस अहमदनगर जिल्हा, उत्तरेस बीड जिल्हा, दक्षिणेस सोलापूर जिल्ह्याचा काही भाग व कर्नाटक राज्याची सीमा आहे.

लातूर जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ 7,157 चौ. कि. मी. आहे व उस्मानाबाद जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ 7,512 चौ. कि. मी. आहे. लातूर जिल्ह्यात एकुण 10 तालुके व उस्मानाबाद जिल्ह्यात एकुण 08 तालुके आहेत. 2001 च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याचा महाराष्ट्रात 26 वा क्रमांक व उस्मानाबाद जिल्ह्याचा 24 वा क्रमांक लागतो.

गृहीतके:-

1. साक्षरतेवर व व्यावसायिक रचनेवर विविध घटकाचा परिणाम होतो.
2. साक्षरतेत व व्यावसायिक रचनेत समानता आढळून येत नाही.
3. साक्षरतेत व व्यावसायिक रचनेत स्थल व काल सापेक्ष परिवर्तन होते.

अभ्यासाची उद्दिष्टे:-

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली आहेत.

1. साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे महत्व जाणून घेणे.
2. साक्षरतेवर व व्यावसायिक रचनेवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
3. साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे बदलते स्वरूप अभ्यासणे.
4. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय एकुण साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.
5. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय ग्रामीण साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.
6. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय नागरी साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.
7. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अनुसूचित जातीतील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.
8. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अनुसूचित जमातीतील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

माहितीस्त्रोत व संशोधन पद्धती:-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्वरूपाच्या माहितीसाठी प्रस्तुत जिल्ह्यातील नमुना निवड पद्धतीने सर्वेक्षण करून मुलाखत तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. दुय्यम स्वरूपाची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, जनगणना पुस्तिका, विविध संशोधन पत्रिका व इंटरनेट चा आधार घेण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मिळवण्यात आलेल्या प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते व आलेखाच्या साहय्याने करण्यात येणार आहे. त्याकरिता सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्याकरिता अभ्यासक्षेत्रातील लोकसंख्येची साक्षरता दर्शविण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$\text{साक्षरता} = \frac{\text{एकुण साक्षर लोक}}{\text{एकुण लोकसंख्या}} \times 100$$

वरील सुत्राच्या आधारे एकुण लोकसंख्येपैकी किती टक्के लोक साक्षर आहेत हे दर्शविले जाते.

लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील व्यावसायिक रचनेचा अभ्यास करतांना प्राथमिक आर्थिक व्यवसाय, द्वितीयक आर्थिक व्यवसाय व तृतीयक आर्थिक व्यवसायाचे तालुकानिहाय वर्गीकरण करण्यात येणार आहे.

तसेच लोकसंख्या व साक्षरता काढण्यासाठी स्पिअरमन रँक सहसंबंध पद्धतीने काढण्यात येणार आहे. यासाठी खालील सुत्राचा वापर करणार आहे.

$$r = 1 - \left[\frac{6\Sigma d^2}{n^3 - n}\right]$$

अभ्यासक्षेत्राची निवड:-

लातूर जिल्हा इ.स. 1982 साली पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातून नव्याने निर्माण झालेला जिल्हा आहे. लातूर जिल्हा हा बालाघाटच्या पठारी प्रदेशावर वसलेला आले. मागील दोन ते तीन दशकापासून लातूर जिल्ह्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात शैक्षणिक सुविधा निर्माण झालेल्या आहेत.

त्यामुळे मराठवाड्याच्या इतर जिल्ह्याच्या मानाने लातूर जिल्ह्यामध्ये साक्षरतेचे व व्यवसायिक रचनेचे प्रमाण अधिक आहे. जिल्ह्यामध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील उद्योग, कृषी, वाहतूक व संदेशवहन यांच्या तुलनेत शैक्षणिक क्षेत्राचा विकास अधिक झालेला आहे.

उस्मानाबाद जिल्हा मराठवाड्यातील बालाघाट डोंगररांगेतील एक महत्वाचा जिल्हा आहे. उस्मानाबाद जिल्हा मराठवाड्यातील इतर जिल्ह्याच्या मानाने खूप जुना जिल्हा आहे. सर्वसाधारणापणे पन्नास वर्षापूर्वी या जिल्ह्याची निर्मिती झाली असली तरी हा जिल्हा विकासाच्या मानाने मागासलेला दिसून येतो. या जिल्ह्यामधील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा अभ्यास करण्यात येणार आहे.

तसेच लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास करण्याकरिता या विषयाची निवड केलेली आहे.

साहित्याचे पुनरावलोकनः-

सदरील विषय अभ्यासाकरिता निश्चित करण्याअगोगर खालील साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

1) **हसन एम. आय. (2005):-**

यांनी भारतातील लोकसंख्येचे विविध घटक व त्यावर प्रभाव करणारे भौगोलिक घटक यावर सखोल संशोधन केलेले आहे.

2) **प्रा. दास एम. एम. (2006):-**

यांनी ईशान्य भारतातील लोकसंख्या वाढ व अन्नधान्य उत्पादन या दोन घटकाचा सखोल अभ्यास केलेला आहे.

3) **डॉ. चंदना आर. सी. (2007):-**

यांनी लोकसंख्येची वैशिष्ट्ये, घटक, संकल्पना आणि पद्धती यांचा अभ्यास केला आहे.

4) **डॉ. अष्टुरे एस. बी. (2009):-**

यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्येची वैशिष्ट्ये व अन्नधान्य संसाधन या दोन घटकाच्या सहसंबंधाचा अभ्यास केलेला आहे.

5) डॉ. गायकवाड यु. टी. (2009):-

यांनी नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जाती व जमाती या दोन घटकातील लोकसंख्या विषयक विविध घटकावर संशोधन केलेले आहे.

6) डॉ. सोनुले यु. बी. (2010):-

यांनी परभणी जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता, लोकसंख्या वितरण, वाढ, लिंगरचना व वयोरचना, साक्षरता, व्यावसायिक रचना व लोकसंख्या प्रक्षेपण इ. घटकावर संशोधन केलेले आहे.

7) डॉ. दुधाटे एस. बी. (2013):-

यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या व कृषी भूमीउपयोजनचा भौगोलिक अभ्यास या घटकावर संशोधन केलेले आहे.

प्रकरण रचना

प्रकरण पहिले:- प्रस्तावना

1.1 प्रस्तावना

1.2 लोकसंख्या भूगोलाचा अर्थ व व्याप्ती

1.3 अभ्यासक्षेत्राची निवड

1.4 उद्दिष्ट्ये

1.5 माहितीस्त्रोत व संशोधन पद्धती

1.6 साहित्याचे पुनरावलोकन

1.7 प्रकरणांची रूपरेषा

प्रकरण दुसरे: अभ्यासक्षेत्राची भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

अ) अभ्यासक्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

2.1 प्रस्तावना

2.2 स्थान, विस्तार व सीमा

2.3 ऐतिहासिक पार्श्वभूमी

2.4 प्राकृतिक रचना

2.5 नदीप्रणाली

2.6 हवामान

2.7 नैसर्गिक वनस्पती

2.8 मृदा

2.9 खनिजे

ब) अभ्यासक्षेत्राची सांस्कृतिक पार्श्वभूमी

2.10 लोकसंख्या

2.11 भूमीउपयोजन

2.12 जलसिंचन

2.13 वाहतूक व संदेशवहन

2.14 कृषीसाधने

2.15 औद्योगिकीकरण

प्रकरण तिसरे: साक्षरता व व्यावसायिक रचना

3.1 प्रस्तावना

3.2 साक्षरतेच्या व व्यावसायिक रचनेच्या व्याख्या

3.3 साक्षरतेवर व व्यावसायिक रचनेवर परिणाम करणारे घटक

3.4 साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे महत्व

प्रकरण चौथे: लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचना

4.1 प्रस्तावना

4.2 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचे व व्यावसायिक रचनेचे सर्वसामान्य वितरण

4.3 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचना 1991

4.4 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचना 2001

4.5 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरता व व्यावसायिक रचना 2011

प्रकरण पाचवे: लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

5.1 प्रस्तावना

5.2 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय एकुण साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

5.3 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय ग्रामीण साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

5.4 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय नागरी साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

5.5 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अनुसूचित जातीतील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

5.6 लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील तालुकानिहाय अनुसूचित जमातीतील साक्षरतेचा व व्यावसायिक रचनेचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण सहावेः क्षेत्र अभ्यास

6.1 प्रस्तावना

6.2 अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक विभाग

6.3 निवडक गावातील स्थान

6.4 लोकसंख्येच्या साक्षरतेची व व्यावसायिक रचनेची वैशिष्ट्ये

6.5 सारांश

प्रकरण सातवेः निष्कर्ष, समस्या व उपाययोजना

1.1 प्रस्तावना

1.2 निष्कर्ष

1.3 समस्या

1.4 उपाययोजना

संदर्भग्रंथ

संदर्भग्रथः-

1. प्रा. दाते व सौ. दाते (2002): प्राकृतिक भू-विज्ञान, अनिरूद्ध पब्लिशिंग हाऊस, 2002, पृष्ठ क्र. 11-12
2. डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ. शहापुरकर (1998): लोकसंख्या भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर, 1998. पृष्ठ क्र. 8-9.
3. लातूर व उस्मानाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन.
4. लातूर व उस्मानाबाद जिल्हा गॅझेटीयर.
5. शर्मा के. के. (2005) संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन (खंड-4) इंटलेक्चुअल बुक ब्युरो, भोपाळ.
6. Mukerji A.B. (1968): "Spatial Pattern of Literacy In Andhra Pradesh, India", Sellected Papers 21, International Geographical Congress.
7. Trewartha G. T. (1969): "A Geography of Population World Pattern," John Wiley and Sons, New York.
8. Visaria Pravin (1971): "The Sex Ratio of Population In India," Census Monograph No. 10. New Delhi.

संशोधिका

जाधव सुचिता बबनराव
मु. पो. कातपुर, ता. जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. वाघमारे जनार्धन केशवराव
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर